क्रिडा व युवक सेवा संचालनालय
म. रा. पुणे
2-6-11
आवक क्र. ४५९५

राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी विहित केलेल्या कार्यपध्दतीमध्ये अतिरिक्त तरतूदींचा समावेश करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : खेआस-२०११/(प्र.क्र.६/११)/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : २१ मे, २०११.

वाचा :- (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-२००२/(प्र.क्र.६८)/क्रीयुसे-२, दिनांक ३० एप्रिल,२००५.
(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-खेआस-२०१०/(प्र.क्र.२७२/१०)/क्रीयुसे-२, दिनांक ९ डिसेंबर,२०१०.

प्रस्तावना :- राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतची कार्यपध्दती उपरोक्त अनुक्रमांक-२ वरील दिनांक ९ डिसेंबर,२०१० च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयानुसार खेळाडूंकडून शासन सेवेत थेट नियुक्ती मिळण्यासाठी प्राप्त होणा-या प्रस्तावांची गुणवत्तेवर छाननी करुन शिफारस करण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यासंबंधात काही बाबी सुस्पष्ट होण्याच्या दृष्टीने काही अतिरिक्त तरतूदी करण्याची केलेली शिफारस शासनाच्या विचाराधीन होती व त्याबाबत शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

: शा स न नि र्ण य : राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यासंबंधात काही बाबी सुस्पष्ट होण्याच्या दृष्टीने मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतलेले आहेत :-

(१) "राज्याचे नाव उज्ज्वल करणारी कामगिरी" म्हणजे कोणती कामगिरी हे स्पष्ट होण्याच्या दृष्टीने खालील अधिकृत स्पर्धामध्ये पदक प्राप्त केलेल्या खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यासाठी विचार करण्यात यावा :-

(अ) गट-"अ" मधील नियुक्तीसाठी :- (१) ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा, (२) जागतिक क्रीडा स्पर्धा, (३) एशियन गेम्स स्पर्धा, (४) कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धा,

(ब) गट-"ब" मधील नियुक्तीसाठी :- (१) आशियाई चॅम्पियनशीप स्पर्धा, (२) ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशीप स्पर्धा, (३) युथ ऑलिम्पिक

(२) खेळाडूंने संबंधित स्पर्धेनंतर ६ महिन्यात थेट नियुक्तीसाठी अर्ज करणे आवश्यक राहील.

(३) खेळाडूंच्या करावयाच्या थेट नियुक्त्या ह्या उपरोक्त अनुक्रमांक-१ येथील दिनांक ३० एप्रिल,२००५ च्या शासन निर्णयानुसार शासन सेवेत खेळाडूंना नियुक्ती देण्यासाठी विहित केलेल्या ५ टक्के आरक्षणाच्या मर्यादेत राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (www.maharashtra. gov.in) उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक-२०११०५२११५२३२००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( कि. शां. परब )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
(२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
(३) मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
(४) संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
(७) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
(८) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),
(९) सर्व मंत्रालयीन विभाग,
(१०) मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(११) मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव,
(१२) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
(१३) निवड नस्ती (क्रीयुसे-२).